# MT- 162

Seat No. | | | | | | |

2013 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - IV

Time : 3 Hours (Pages 5) Max. Marks : 80

---

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

१) त्या तेजस्वी नेत्रांत ..........
अ) करारी भाव तरळत होता. ब) मायाळू भाव तरळत होता.
क) शांत भाव तरळत होता.

२) आमच्या घरात मुस्लीम म्हणून ..........
अ) दोन ईद साजऱ्या केल्या जात. ब) खर्च जास्त होत असे.
क) संदलचा दिवस साजरा करीत.

३) हिमशिखरावर रेंगाळणारे ढग ..........
अ) आता खाली उतरले आहेत. ब) आता वर जात आहेत.
क) आता स्थिर आहेत.

४) केशवची आई ..........
अ) सरिताकडे असते. ब) गावालाच असते. क) केशवकडेच असते.

**प्र.१. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

१) एकदा मी घार झालो .......... फिरून आलो. (ढगात, नभात, आभाळात)

२) मास्तर .......... चालले याचंच कौतुक अधिक होतं.(अमेरिकेत, रशियात, परदेशात)

३) पण .......... मोठे झाल्याने तिला बोलवत नसे. (ओठ, तोंड, पोट)

**प्र.१. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) इंग्रज लोक कसे असतात असे लेखिकेने ऐकले होते ?

२) बाबा आमटे यांचे घराणे कोणत्या पद्धतीचे होते ?

३) ऋतुचक्रासोबत कोणाशी नाते सांगायचे ?

**प्र.२. अ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे' असे कृष्णाबाई का म्हणतात ?

२) बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती स्पष्ट करा.

३) केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले ?
४) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?
५) स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे ?

**प्र.२. आ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

१) महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने अभिमंत्रित झालेले ते ठिकाण होते.
२) वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला.

**प्र.३. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) उंच नभात काय फडफडत आहे ?
२) संत नरहरी सोनार यांच्या मते पांडुरंग कोणाला क्षमा करतो?
३) कवीच्या मते हरी कोठे असतो ?

**प्र.३. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

१) खुले हसणे दिसेल माझ्या .......... ओठी ! (पक्ष्यांच्या, चिमण्यांच्या, पिल्लांच्या)
२) आपण जिजाऊच्या .......... (पाती, साथी, जाती)
३) .......... मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी. (झुरते, रेंगाळते, धावते)

**प्र.४. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

१) अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची ।।
२) सारा निसर्गच बदलावा माणसाला बदलण्यासाठी

**प्र.४. आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) कवी ग.दि. माडगूळकर यांच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे-कोठे घडते ?
२) कवीच्या मनातील बेचैनीचे भाव केव्हा नाहीसे होतात ?
३) संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?
४) माझ्या घरट्यात कोणत्या गोष्टी नाहीत, असे कवी म्हणतो ?
५) कवीच्या मते स्त्रीने आपले हक्क मिळविण्यासाठी काय करावे ?

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

१) जुईचे आईबाबा घरी कोणकोणती कामे करतात?
२) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?

३) स्वातंत्र्यचळवळीत कोणकोणती विधायक कामे केली गेली ?

४) पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील कोणती वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

१) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.

२) 'मुलांचे स्वप्न' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.६. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

१) कुष्ठरोगाचे जंतु स्वतःच्या शरीरात टोचुन घेण्यासाठी ते तयार झाले.

२) त्यांची कवीता तेरावी, चौदावीची मुलं अभासत होती.

**प्र.६. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

१) नवरात्र २) रामलक्ष्मण ३) पापपुण्य ४) पानसुपारी

**प्र.६. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१) रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे. (प्रश्नार्थी करा)

२) केशवला अनेकदा फोन केले. (उद्‌गारार्थी करा)

३) किती गर्दी असे या सामुदायिक नमाजाला ! (विधानार्थी करा)

**प्र.६. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(टापटीप राहणे, ज्ञानी करणे, कूस बदलणे, छातीशी धरणे, धीट होणे, चुरगळून टाकणे)

१) झोपेतच बाळ डाव्या कुशीवर वळला.

२) गुरूचं प्रथम कर्तव्य म्हणजे विद्यार्थ्यांना शिक्षित करणे होय.

३) एन्.सी.सीच्या कॅम्पमुळे भित्रा अजय धाडसी झाला.

४) छोटा राज मिळेल तो कागद कुस्करून टाकतो.

५) कामाला लागल्यावर नरेंद्र नीटनेटका राहू लागला.

६) वर्षभराने गावी आलेल्या जयला आजीने प्रेमाने जवळ घेतले.

**प्र.७. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

ज्या जगात मी आलो ते जग मृत्यूपूर्वी मी सुंदर करून जाईन, अशी जिद्द हवी. आपण जीवनाकडे पाहतच नाही. तरूण असंतुष्ट म्हणून ओरड होते. मी म्हणतो, तरूण असंतुष्ट नाहीत, तो काय देश आहे? तरूणांनी असंतुष्टच राहिले पाहिजे. पण ते या अर्थाने की त्यांनी जीवनाचे आव्हान स्वीकारायचे. 'प्राप्तकाल

हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा.' असे केशवसुतांनी सांगितले आहे. त्यातील 'लेणी' हा शब्द सुंदर आहे. कलानिर्मिती ही अवघड कामगिरी आहे. ही निर्मिती सहजासहजी होत नाही. त्यासाठी पत्थर फोडून त्याच्याशी झुंज द्यावी लागते. हे आव्हान तुम्ही स्वीकारा, तशी जिद्द बाळगा, एवढेच माझे आजच्या तरूण पिढीला सांगणे आहे.

**प्र.७. आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

१) **मुद्दे :-** नावेतून प्रवास – एक पंडित – दुसरा नावाडी – पंडिताची नावाड्याकडे शिक्षणाबाबत चौकशी – नावाडी अशिक्षित – पंडिताचे मत – नावाड्याचे अर्धे आयुष्य फुकट – तेवढ्यात वादळ – नावाडी पंडिताला विचारतो – पोहता येते? पंडित नाही म्हणतो – पूर्ण आयुष्य फुकट – नावाडी म्हणतो – तात्पर्य.

२) **मुद्दे :-** एक सैनिक – लढाईवर असताना शत्रूकडून कैद – तुरूंगात हाल सहन करणे – सुटका – रस्त्यात पोपट विकणारा – सर्व पोपटांचे पिंजरे खरेदी करून सर्व पोपटांना सोडून देणे – पोपट विकणारा आश्चर्यचकित – कारण विचारणे – सैनिकाने खुलासा करणे – स्वातंत्र्याचे महत्त्व – तात्पर्य.

**प्र.७. इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **4**

१) दिपक/ दिपिका काळे, सहलप्रमुख, सरस्वती विद्यालय, तुळशीबाग, पुणे हा/ही मा. आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, पुणे यांच्याकडे सहलीसाठी बसची मागणी करतो/करते. या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

२) संदिप / सुदिपा चव्हाण, संजीवनी निवास, मुलुंड (प.) मुंबई येथून दूषित पाण्याबाबत मा. पाणीपुरवठा अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहितो / लिहिते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

शाळेसमोर झालेल्या अपघाताचा वृत्तांत लिहा.

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

एका रिसॉर्टची जाहिरात करा.

**प्र.८. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

१) माझे आजोबा
(**मुद्दे :-** आजोबांचे कुटुंबातील स्थान - त्यांचा स्वभाव, गुण - वैशिष्ट्य - त्यांचे एकूण व्यक्तिमत्व दैनंदिन कार्यक्रम - संस्कार - कुटुंबावर त्यांच्या विचारांचा परिणाम - सर्वांविषयी प्रेम - त्यांच्याविषयी आदराची भावना - शेवट.)

२) मला देव भेटला तर...
(**मुद्दे :-** ही कल्पना का सुचली ? - सर्वत्र फक्त प्रकाश - निसर्गाचे चक्र थांबेल - जीवन अस्ताव्यस्त - होणारे दुष्परिणाम - मानवाची स्थिती - तुम्ही अशावेळी कसे वागाल ? कल्पना भंयकर - शेवट.)

३) विदूषकाचे आत्मवृत्त
(**मुद्दे :-** परिचय - बालपण - जबाबदारीचे ओझे - सर्कसमध्ये नोकरी - प्रशिक्षण - मिळणारा आनंद - सेवाभाव हेच ध्येय, अनुभव - समाधानी.)

**Best Of Luck** 👍

**PAPER - IV**

# MT-162

**2013 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - IV**

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| १) | त्या तेजस्वी नेत्रांत **शांत भाव तरळत होता.** | 1 |
| २) | आमच्या घरात मुस्लीम म्हणून **दोन ईद साजऱ्या केल्या जात.** | 1 |
| ३) | हिमशिखरावर रेंगाळणारे ढग **आता खाली उतरले आहेत.** | 1 |
| ४) | केशवची आई **गावालाच असते.** . | 1 |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| १) | एकदा मी घार झालो **आभाळात** फिरून आलो. | 1 |
| २) | मास्तर **परदेशात** चालले याचंच कौतुक अधिक होतं. | 1 |
| ३) | पण **पोट** मोठे झाल्याने तिला बोलवत नसे. | 1 |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | इंग्रज लोक अबोल, दुरावा राखणारे असतात असे लेखिकेने ऐकले होते. | 1 |
| २) | बाबा आमटे यांचे घराणे 'मालगुजार' या पद्धतीचे होते. | 1 |
| ३) | ऋतुचक्रासोबत निसर्गाशी, पर्यावरणाशी नाते सांगायचे. | 1 |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'मास्तर आणि मी' हा पाठ लेखिका 'कृष्णाबाई सुर्वे' यांनी लिहिला आहे. या पाठात सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.<br>सुर्वे यांच्या कवितांची पहिली श्रोता कृष्णाबाईच असायच्या. कविता लिहून झाली की सुर्वे ती कविता लेखिकेला वाचून दाखवायचे. सुर्वे कविता लिहितात यांचा आनंद लेखिकेलाही व्हायचा. पण तो आनंद कसा व्यक्त करायचा, हे त्यांना समजत नसे. अनेकदा संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द त्यांच्या कानावर पडायचे, पण त्यातला भाव लेखिकेला समजायचाच नाही. कारण त्यांचे स्वतःचे मन त्यांना सांगायचे की कृष्णाबाई तुला काही कळतंय का त्यातले? कारण तू एक अडाणी बाई आहेस ? तुला काही समजणार नाही आणि बावळटासारखं उगाच काहीतरी बोलून स्वतःच हसू करून घेशील.<br>अशाप्रकारे कृष्णाबाई स्वतःच्या न्युनगंडामुळेच गप्प बसायच्या. म्हणूनच त्या म्हणतात, 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे.' | 3 |

| | | |
|---|---|---|
| २) | 'माणुसकीचा झरा' हा पाठ लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>बाबा आमटे वडिलांच्या इच्छेनुसार वकिली करत होते. पुढे ते वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष झाले. त्या कामाबरोबर त्यांचे इतर समाजकार्य चालू होते. हे कार्य करत असताना एके दिवशी त्यांना रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला एक महारोगी म्हणजेच तुळशीराम त्यांना दिसला. त्यानंतर अशा महारोग्यांची सेवा करण्याचे व्रत त्यांनी घेतले. वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने तुळशीरामचा मृत्यू झालेला पाहून त्यांना अतिशय दुःख झाले. त्यावेळी या वेदनेचे आनंदात रूपांतर करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यातून साधनाताईंच्या मदतीने त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी 'आनंदवन' निर्मिले.<br>कुष्ठरोगाचा अभ्यास करण्यासाठी ते कलकत्त्याला गेले. कुष्ठरोग कोणत्याही प्राण्याला होत नाही. त्यामुळे यावरचे संशोधन करण्यालाही त्यांनी स्वतःचे शरीर देऊ केले. कुष्ठरोगाचे जंतू स्वतःच्या शरीरात वेचून घेण्यासाठी ते तयार झाले.<br>आनंदवनाच्या निर्मितीसाठी बाबांनी वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला. सर्व जातीधर्माच्या लोकांनी एकत्र आनंदाने राहायचे. प्रत्येकाने दिवसभर आपापले काम करायचे. संध्याकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी-भाकरी बनवायची आणि मजेने खायची. बाबांची ही छोटी वसाहत अनेक वर्षे गुण्यागोविंदाने आनंदात राहत होती.<br>अशाप्रकारे समाजकार्यातून बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती दिसून येते. | 3 |
| ३) | 'बाबूजी' हा पाठ लेखक 'संजय गिरासे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>केशवच्या बंगल्यात लेखकाला माणुसकी कुठेच दिसली नाही. फक्त व्यवहार आणि पैसा दिसत होता. केशव अगदी भरभरून आपल्या बंगल्याचे, एकेक वस्तूचे कौतुक करत होता. ते वर्णन ऐकून, पाहून लेखक थकून गेला होता. त्याचे डोके खूप दुखत होते. तो जेवला आणि तोंडावर पांघरूण घेऊन झोपला. पण त्याला झोप येत नव्हती. तो खूपच अस्वस्थ झाला होता. लेखक विचार करत होता. गावातल्या माणसाला केशवने घरी बोलावले नव्हते तर त्याच्या बंगल्याची श्रीमंती बघायला बोलावले होते. बंगल्याला केशवने 'बाबूजी' नाव दिले होते. पण घरात बाबुजीचं अस्तित्व कुठेच जाणवत नव्हते. साऱ्या गप्पांमध्ये केशवने गावी राहणाऱ्या विधवा आईची साधी चौकशीही केली नव्हती. लेखकाने न राहवून सांगितले तर त्याने ऐकून न ऐकल्यासारखे केले. 'कुठून आपल्याला दुर्बुद्धी सुचली.' असा विचार लेखकाच्या मनात येऊन गेला. स्वतःभोवती विशिष्ट प्रकारचं वलय निर्माण करून जगणाऱ्या माणसाच्या घरात राहण्यापेक्षा बस स्टॅण्डवरच्या बाकावर झोपलो असतो तर शांत झोप लागली असती, असा एक विचार त्याच्या मनात आला.<br>केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात असे वेगवेगळे विचार आले. | 3 |

४) 'संवाद, विसंवाद' हा पाठ लेखिका 'शांता शेळके' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे. **3**

मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजूत असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो. पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळीकीमुळे चमत्कारिक अवघडलेपणा वाट्याला येतो. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहित असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहित असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.

या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते.

५) 'अपूर्व भेट' हा पाठ लेखक 'रणजित देसाई' यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदाचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे. **3**

राजा रविवर्मा स्वामीजींच्या आगमनाने अत्यंत आनंदित झाले. स्वामीजींचे अलौकिक तेज व त्यांचे व्यक्तिमत्त्व यांनी रविवर्मा भारावले होते. स्वामीजींची हिंदू धर्माबद्दलची व्याख्यानं देशात, परदेशात प्रसिद्ध झाली होती. तसेच राजा रविवर्मादेखील आपल्या चित्रकलेत विश्वविख्यात होते. त्यांनी हिंदू धर्माची दैवतं घरोघरी पोहोचवली होती. अशाप्रकारे दोघांनी आपल्या कलेतून आणि व्याख्यानातून हिंदू धर्म देशात, परदेशात व घराघरात पोहचवला. दोघेही आपआपल्या ठिकाणी प्रतिभावंत असूनदेखील दोघांच्या ठिकाणी असलेला कलेबद्दलचा आदर, हिंदू धर्माबद्दल असलेली जाणीव व स्वभावातील नम्रपणा, आपुलकी आपणास पाहावयास मिळते.

म्हणूनच लेखकाने स्वामीजी व रविवर्मा यांच्या भेटीला 'अपूर्व भेट' असे म्हटले आहे.

उ.२. **आ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

१) **संदर्भ :** वरील वाक्य 'शाश्वत शिक्षणसंपत्ती' या लेखक 'चंद्रशेखर धर्माधिकारी' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने त्यांच्या शिक्षकांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला आहे. **3**

**स्पष्टीकरण :** लेखकाचे आईवडील देशभक्त होते. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांचा सक्रीय सहभाग होता. परिणामी आईवडिलांना वेळोवेळी जेलमध्ये जावे लागे. त्यामुळे लेखकाच्या शिक्षणात सातत्य नव्हते. वेळोवेळी त्यांना शाळा बदलावी लागे. असेच १९३५ साली ते वर्धा येथे आले. त्यावेळी ते बजाजवाडीत राहत होते. हे ठिकाण महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने पवित्र झालेले ठिकाण होते. त्याचे माहात्म्य सांगताना लेखक म्हणतात की, बजाजवाडी हे चालते-बोलते तीर्थक्षेत्र होते. भारतीय राष्ट्रीय जीवनात जी दिव्य तत्त्वे,

| | | |
|---|---|---|
| | कल्याणकारी भाव, पावित्र्ययुक्त माधुर्य होते, त्या सर्वांचे ते पुण्यक्षेत्र होते. ते महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने अभिमंत्रित झालेले ठिकाण होते.<br>**वैशिष्ट्य** : महात्मा गांधीजींबद्दलची आदराची भावना येथे दिसून येते. | |
| २) | **संदर्भ** : वरील वाक्य 'माणुसकीचा झरा' या लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>**स्पष्टीकरण** : बाबांनी दुःखी-पिडितांच्या सेवेचे व्रत स्विकारले होते. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी साधनाताईंची मोलाची साथ मिळाली. साधनाताईंनीही जीवनातील कष्टाचे व त्यागाचे महत्त्व आत्मसात केले होते. आपल्या पतीने स्वीकारलेल्या व्रतासाठी त्यांनीही स्वतःला समर्पित केले. कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा वसा त्यांनी घेतला होता. त्याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोगी तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्याच्या दुःखाने बाबांना खूपच दुःख झाले. त्यांनी आपल्या मनातील ही अस्वस्थता साधनाताईंजवळ व्यक्त केली. आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी त्या पतीपत्नींनी आपले सारे जीवन आनंदाने समर्पित केले. दुःखाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला आणि त्यातून पुढे आनंदवनाची निर्मिती झाली.<br>**वैशिष्ट्य** : दुखितांप्रती असलेल्या सहानुभूतीचे दर्शन येथे घडते. | **3** |
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | उंच नभात तिरंगा फडफडत आहे. | **1** |
| २) | संत नरहरी सोनार यांच्या मते जो आपल्या हातून घडलेल्या अपराधांची क्षमा मागतो, पांडुरंग त्या भक्ताला क्षमा करतो. | **1** |
| ३) | कवीच्या मते जिथे हात राबतात, तिथे हरी असतो. | **1** |
| उ.३. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| १) | खुले हसणे दिसेल माझ्या **चिमण्यांच्या** ओठी ! | **1** |
| २) | आपण जिजाऊच्या **पाती**. | **1** |
| ३) | **रेंगाळते** मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी. | **1** |
| उ.४. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| १) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'किती हे सुख' या 'संत सोयराबाई' यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मी पणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण** : माणसे संसारात, प्रपंचात खरे सुख मानतात. मोहमायेत अडकून पडतात. पत्नी, पुत्र यासारख्या नातेसंबंधात त्यांचे मन गुंतलेले असते. धन, संपत्ती या मोहजालात | **3** |

| | | |
|---|---|---|
| | ते गुरफटून पडतात. अशा या संसारातून मिळणारे सुख हे क्षणिक असते. ज्याप्रमाणे आकाशातील ढगांची सावली जरी खरी वाटत असली तरी ती क्षणिक असते. त्याचप्रमाणे संसारातील सुख क्षणभंगूर असते.<br>**वैशिष्ट्य** : या ठिकाणी संत सोयराबाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते. | |
| २) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'प्रलय' या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी 'रोहिदास पोटे' आहेत. या कवितेत माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनाने जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>**स्पष्टीकरण** : कवितेतील निसर्ग म्हणजेच जुन्या विचारांचा समाज होय. अशा या समाजातील चालीरिती, रूढी, परंपरा, जुने विचार, जातिव्यवस्था या अनेक बंधनांनी माणसातील माणूसपण बांधले गेले आहे. त्यामुळे संपूर्ण मानवी समाजव्यवस्था, विचारव्यवस्था बदलावी असे कवीला वाटते. जेणेकरून माणसातील माणुसकी जीवंत राहील व मानवी समाजात माणसाला माणूस म्हणून किंमत प्राप्त होईल.<br>**वैशिष्ट्य** : माणसातील माणूसपण टिकून राहावे म्हणून केलेली प्रार्थना येथे दिसून येते. | 3 |
| उ.४. | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'जिथे राबती हात' ही कविता कवी 'ग. दि. माडगूळकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात की, ज्या ठिकाणी माणसे कष्ट करतात, घाम गाळतात तेथे विविध रूपात परमेश्वर उभा राहतो. शेतकरी आपल्या शेतात खूप राबतात, मेहनत करतात. त्याठिकाणी अन्नाच्या रूपात परमेश्वर उभा राहतो. अशा शेतात परमेश्वराचे सावळे रूप दिसते. पाथरवट लोक रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना विविध आकार देतात. शिवाय विणकर लोक कापसापासून सुंदर कापड तयार करतात. अशा मेहनत करणाऱ्या लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो.<br>अशाप्रकारे कवी ग.दि.माडगूळकरांच्या मते, ज्या ठिकाणी कष्ट केले जातात, त्याठिकाणी परमेश्वराचे दर्शन घडते. | 3 |
| २) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>कवीचे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कवीला आपले गाव खूप खूप आवडते. परंतु असे असले तरी पोट भरण्यासाठी त्याला दूर शहरात जावे लागले. वीतभर पोटासाठी त्याला आपले लाडके गाव सोडावे लागले. त्यामुळे गावाच्या अनावर ओढीने त्याचे मन बेचैन होते, अस्वस्थ होते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा जेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे गाव आठवणींच्या रूपात दिसू लागते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव निघून जातात. गावाच्या आठवणींमुळे त्याच्या मनाला शांतता, समाधान लाभते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | अशाप्रकारे जेव्हा कवीला त्याचे गाव आठवणीतून डोळ्यांसमोर दिसते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव नाहिसे होतात. | |
| ३) | 'आजि सोनियाचा दिवस' हा अभंग 'संत सेना महाराज' यांनी लिहिला आहे. या अंभगात संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे.<br>संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस माझ्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते. तसाच सर्व संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दुःख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. अशाप्रकारे संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे.<br>अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे. | 3 |
| ४) | 'माझ्या घरट्यात' ही कविता कवी 'सूर्यकांत खांडेकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती महत्त्वाची असते. त्याबाबत कवी म्हणतो, त्याच्या घरट्यात म्हणजेच घरात हिऱ्यामाणकांची रास नाही. म्हणजेच त्याच्याकडे मौल्यवान वस्तू नाहीत. त्याच्या घरट्यात कल्पफुलांचा संभार म्हणजेच कल्पनेतील फुलांचा साठा नाही. कवीच्या घरात भौतिक ऐश्वर्य कुठेच दिसत नाही. त्याच्या घरी चांदरातीचे मोहोळ म्हणजेच केवळ स्वप्नरंजकता नाही. कवीच्या घरात एकतारी एकस्वर असल्यामुळे सातसुरांचा झंकार म्हणजेच वाद, संघर्ष दिसत नाही. शेवटी कवी म्हणतो की, त्याच्या घरात सुखासमाधानाचे वातावरण असल्यामुळे तेथे कधीही कोणाच्याही कपाळाला आठी दिसत नाही.<br>अशा या विविध गोष्टी कवीच्या घरट्यात नाहीत. | 3 |
| ५) | 'आपण धरणी गं' ही कविता कवी 'ऋषीकेश कांबळे' यांनी लिहिली आहे. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन केले आहे.<br>स्त्रीमध्ये सर्व प्रकारची योग्यता असते. ती त्यागमय जीवन जगत असते. स्वतः सर्व प्रकारचे हाल सोसून दुःख गिळून साऱ्या जगाला पोसत असते. स्वतःच्या मनाची, इच्छा-आकांक्षांची माती करून नातीगोती जपत असते. मात्र एवढे सगळे करूनही तिला सतत उपेक्षेला बळी जावे लागते. पण या सगळ्या गोष्टींचा आता भूतकाळ व्हावा असे कवितेतील स्त्री म्हणते.<br>या स्त्रीने इतर महान स्त्रियांची, त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून घ्यावी आणि आपणही त्याच मार्गाने चालावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासाठी तिने दुःख न | 3 |

| | | |
|---|---|---|
| | बाळगता कणखर बनले पाहिजे असे कवितेतील स्त्री म्हणते. ती म्हणते, आता तू अन्यायाविरुद्ध ललकारी देऊन पुढे ये. अंधार दूर करण्यासाठी दिवा जसा जळतो तशी आता तूही तुझ्या तेजाने तळपून जा आणि या अंधारावर मात करताना उजेडाचे गाणे म्हणत जा.<br>अशाप्रकारे आपले हक्क मिळविण्यासाठी स्त्रीने जागृत होऊन लढले पाहिजे, असे कवीला वाटते. | |
| उ.५. | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.<br>अशाप्रकारे जुईचे आईबाबा सहकार्याने घरातली सारी कामे करतात. | **4** |
| २) | 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून केला आहे.<br>पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.<br>अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते. | **4** |
| ३) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. | **4** |

गावा-गावांतील स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीने विधायक कार्य करणाऱ्या लोकांना एकत्र आणून राष्ट्रीय आंदोलनाची वाढ कशी होईल याचा विचार केला जात होता. त्याचबरोबर वेगवेगळ्या तालुक्यांत अनेक गावांतून सभा व परिषदा घेतल्या जायच्या. तेथे शाहिरी व कवने म्हणणाऱ्या मुलांना प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. गावा-गावांत राष्ट्रीय आंदोलनाची वाढ व्हावी यासाठी राष्ट्रीय विचारांच्या व्यक्तींना आणून व्याख्याने आयोजित केली जात असत. खादी वापराचा प्रचार केला जात असे. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्याचे महत्त्व याकडे कटाक्षाने लक्ष दिले जायचे. रचनात्मक आदर्श समाज घडविण्यासाठी अनेक सामाजिक नीतिमुल्ये निर्माण केली. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना इत्यादी कार्यक्रम राबविले.

अशाप्रकारे स्वातंत्र्यचळवळीत विविध विधायक कामे करण्यामागे त्याग, बलिदान, राष्ट्रप्रेम व समाजहिताची तळमळ होती.

४) <u>'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व'</u> हा पाठ लेखक <u>'आनंद यादव'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे. 4

पंढरपुरातील नागरिकांचे स्नान हे चंद्रभागेच्या पाण्यात वेगळ्याच शैलीत चालते. पंढरपुरीच्या चंद्रभागा स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. श्लोक, मंत्र, स्तोत्र म्हणत, मनात विठ्ठलाचे ध्यान करत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात व नंतरच घरी जातात. लेखक जेव्हा १९६१ मध्ये पंढरपुरला गेले तेव्हा ते गाव सकाळी आठ वाजेपर्यंत झोपलेले असायचे. प्रत्येक दुकानाच्या आडव्या फळ्यांवर माणसे खुशाल झोपलेली दिसत. पंढरपुरी संस्कृती वेगळ्या उद्योगाची होती. ती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली असायची. विठ्ठलमंदिर हे त्या संस्कृतीचे केंद्र होते. पंढरपुरीत मठांची संख्या भरपूर आहे. वर्षभर पंचक्रोशीतील आणि वारीच्या वेळी वारकरी तेथे जमत असत. पंढरपुरात गल्ल्यांना, चौकांना तसेच दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली दिसतात.

रत्नागिरी शहरात एकही तालीम नाही. येथील मासळी बाजार खूप मोठा आहे. त्याचा उग्र वास वातावरणात भरलेला असतो. लाल, लाल साध्या रस्त्यांचे देखणेपण रत्नागिरीला लाभले आहे. समुद्राची गाज रात्रभर वातावरणात गंभीरपणे भरून राहते. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, याचे लेखकाला आश्चर्य वाटते.

अशाप्रकारे पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील विविध वैशिष्ट्ये लेखकाने वर्णन केली आहेत.

<u>**किंवा**</u>

| | | |
|---|---|---|
| | **खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** | |
| १) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.<br>१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.<br>याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे.<br>काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली. | **8** |
| २) | 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची | **8** |

| | | |
|---|---|---|
| | शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे.<br>एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपकन चिनारच्या डोक्यात पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.<br>भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाही. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले. | |
| उ.६. | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| १) | कुष्ठरोगाचे **<u>जंतू</u>** स्वतःच्या शरीरात **<u>टोचून</u>** घेण्यासाठी ते तयार झाले. | **2** |
| २) | त्यांची **<u>कविता</u>** तेरावी, चौदावीची मुलं **<u>अभ्यासत</u>** होती. | **2** |
| उ.६. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| १) | नवरात्र - नऊ रात्रींचा समूह - द्विगू समास | **1** |
| २) | रामलक्ष्मण - राम आणि लक्ष्मण - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| ३) | पापपुण्य - पाप किंवा पुण्य - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| ४) | पानसुपारी - पान, सुपारी वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| उ.६. | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १) | रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर आहे का ? | **1** |
| २) | किती फोन केले केशवला ! | **1** |
| ३) | या सामुदायिक नमाजाला खूप गर्दी असे. | **1** |

| | | |
|---|---|---|
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| १) | झोपेतच बाळाने **कूस बदलली**. | 1 |
| २) | गुरूचं प्रथम कर्तव्य म्हणजे विद्यार्थ्यांना **ज्ञानी करणे** होय. | 1 |
| ३) | एन्.सी.सीच्या कॅम्पमुळे भित्रा अजय **धीट झाला**. | 1 |
| ४) | छोटा राज मिळेल तो कागद **चुरगळून टाकतो**. | 1 |
| ५) | कामाला लागल्यावर नरेंद्र **टापटीप राहू लागला**. | 1 |
| ६) | वर्षभराने गावी आलेल्या जयला आजीने **छातीशी धरले**. | 1 |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| १) | प्रत्येकाच्या मनात कोणती जिद्द हवी ? | 1 |
| २) | केशवसुतांनी काय सांगितले आहे ? | 1 |
| ३) | कोणती कामगिरी अवघड आहे ? | 1 |
| ४) | तरूणांसंबंधी कोणती ओरड होते ? | 1 |
| उ.७. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 53 - Q.04 | 4 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 56 - Q.10 | 4 |
| उ.७. | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 89 - Q.04 | 4 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 95 - Q.10 | 4 |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.101 - Q.04 | 4 |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 109 - Q.05 | 4 |
| उ.८. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 06 - Q.06 | 10 |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 25 - Q.22 | 10 |
| ३) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 37 - Q.34 | 10 |

❑❑❑❑❑